RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक १३२ (४)] गुरुवार, सप्टेंबर १९, २०१९/भाद्र २८, शके १९४१ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३६७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस. ०३१९/प्र.क्र.९२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (एच १) च्या उपखंड (दोन) यासह पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेला अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मितीचे नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ च्या नियम ११ मधील पोट-नियम (२) मधील,—

(अ) खंड (अ) मधील " वैधानिक इशारा मद्य सेवन हे आरोग्यास हानीकारक आहे " हे शब्द वगळावेत.

(ब) खंड (ब) मधील " वैधानिक इशारा मद्य सेवन हे आरोग्यास हानीकारक आहे " हे शब्द वगळावेत.

(क) खंड (ब) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“ (क) सर्व बीअर व वाईन च्या बाटल्या/आवेष्टके यांच्या प्रत्येक लेबलवर अन्न सुरक्षा आणि प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांनी वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे व नमुन्यामध्ये वैधानिक इशारा “ मद्य सेवन आरोग्यास हानीकारक आहे. सुरक्षित रहा-मद्य सेवन करून वाहने चालवू नका ” असे मुद्रीत करण्यात येईल.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 19th September 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS. 0319/CR.92/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and wine Rules, 1966, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub clause (ii) of clause *(h 1)* of sub-section (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend Maharashtra Manufacture of Beer and wine Rules, 1966 as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Manufacture of Beer and wine (Amendment) Rules, 2019.

2. In rule 11 of the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, in sub-rule (2),—

*(a)* in clause *(a),* the words “statutory warning consumption of liqour is injurious to health” shall be deleted ;

*(b)* In clause *(b),* the words “and the statutory warning consumption of liqour is injurious to health” shall be deleted ;

*(c)* after clause *(b)*, the following clause shall be added, namely :—

“*(c)* A statutory warning “Consumption of Alcohol is injurious to health. Be safe- Don’t Drink and Drive” in the format and as prescribed by the Food Safety and Standards Authority of India (FSSAI) from time to time shall be printed on every label of all bottles and packages containing Beer or Wine.”

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,

Joint Secretary to Government.